**राज्यात नवीन प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या (PACS) नोंदणीचे निकष सुधारित करणे व कार्यरत संस्थांचे सक्षमीकरण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र:-संकिर्ण ०७२५/ प्र.क्र. १७४/१८-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १७ फेब्रुवारी, २०२६

**वाचा :-**

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. ससेवा-९११/प्र.क्र.१०४७/२-स, दि. २३.०९.२०१३
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. ससेवा-९११/प्र.क्र.१०४७/२-स, दि. १६.०१.२०१५
३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. ससेवा-९११/प्र.क्र.१०४७/२-स, दि. १४.०२.२०१७
४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. सआ-३/ कृषीपत/नविन कृषी पतसंस्था नोंदणी निकष/१७२८/सन २०२५, दि. ३०.०७.२०२५

**प्रस्तावना:-**

राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या (PACS) नोंदणीसाठी शासनामार्फत दि. २३.०९.२०१३ रोजीचा शासन निर्णय, दि. १६.०१.२०१५ व दि. १४.०२.२०१७ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार संस्था नोंदणीचे निकष विहीत करण्यात आले आहेत. तथापि, केंद्र शासनाचे याबाबतचे धोरण विचारात घेता सदरचे निकष सुधारित करणे आवश्यक असल्याने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी वाचा क्र. ४ अन्वये राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या (PACS) नोंदणी बाबतचे निकष सुधारित करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या नोंदणीचे निकष सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यात नव्याने प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची (PACS) नोंदणी करण्यासाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहे.

१) एका महसुली गावात एकच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था असावी.
२) नोंदणीसाठी प्रस्ताव दाखल झालेल्या लगतपूर्वीच्या आर्थिक वर्षातील महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी क्षेत्रातील बॅका अथवा प्रादेशिक ग्रामीण बँकांनी निश्चित केलेल्या पीक कर्ज दरानुसार (Scale of Finance) नियोजित

प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेचा संभाव्य पीक कर्ज पतपुरवठा खालीलप्रमाणे होणे आवश्यक आहे :

| विभाग | संभाव्य पीक कर्ज पतपुरवठा |
|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र (खानदेशसह) | रु. १.५ कोटी |
| कोकण, मराठवाडा व विदर्भ | रु. १.० कोटी |
| राज्यातील आदिवासी भागातील गावे | रु. ५० लाख |

३) नव्याने नोंदणी होणाऱ्या प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेची नोंदणी करताना त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किमान १० आर (गुंठे) क्षेत्र धारण करणा-या एकूण खातेदारांपैकी किमान ७० टक्के खातेदार प्रवर्तक सभासद अथवा ७५ खातेदार यापैकी कमी असेल तितके खातेदार नियोजित संस्थेच्या प्रस्तावात प्रवर्तक सभासद असणे आवश्यक राहील.

४) नियोजित प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेच्या नोंदणीवेळी खालीलप्रमाणे किमान भागभांडवल जमा करणे आवश्यक आहे.

| विभाग | किमान भागभांडवल |
|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ५.० लाख |
| उत्तर महाराष्ट्र (खानदेशसह) | रु. ४.० लाख |
| विदर्भ, मराठवाडा व कोकण | रु. २.० लाख |
| राज्यातील आदिवासी भागातील गावे | रु. १.० लाख |

५) नियोजित प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी व प्रस्तावाची आर्थिक सक्षमता तपासण्यासाठी खालीलप्रमाणे समिती राहील :

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २. | संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ३. | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था | सदस्य |
| ४. | संबंधित तालुक्याचे उप / सहायक निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ५. | उपनिबंधक, सहकारी संस्था (कृषिपत) मुख्यालय, पुणे | सदस्य |

६) राज्यात सध्या कार्यरत असलेल्या परंतु अर्थक्षम नसलेल्या ज्या संस्थांचे नक्त मूल्य उणे आहे (Negative Net worth) व जोखीम संपत्तीचे भांडवलाशी प्रमाण (CRAR) ७.० % पेक्षा कमी आहे अशा प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांबाबत खालील प्रमाणे धोरण राहील.

अ) ज्या प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे नजीकच्या संस्थेत विलीनीकरण करणे शक्य आहे अशा प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे नजीकच्या संस्थेत विलीनीकरण करण्यात यावे.

ब) ज्या संस्थांचे आर्थिक सक्षमीकरण शक्य आहे अशा संस्थांनी पुढील तीन वर्षांचा (सन २०२६-२७ ते सन २०२८-२९) आर्थिक सक्षमीकरणाचा कृती कार्यक्रम तयार करुन संबंधित निबंधकांना दि. ३०.०६.२०२६ पर्यंत सादर करावा.

ज्या संस्था वरिलप्रमाणे दि. ३०.०६.२०२६ पर्यंत कृती कार्यक्रम तयार करणार नाहीत, पुढील तीन वर्षात कृती कार्यक्रमाची अमंलबजावणी करणार नाहीत व कृती कार्यक्रमाची अमंलबजावणी केल्यानंतरही पुढील तीन वर्षात आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाहीत अशा संस्थांचे नजीकच्या सक्षम प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थेमध्ये विलीनीकरण करणे अथवा अशा संस्था अवसायनात घेणेबाबत संबंधित निबंधकामार्फत कारवाई करण्यात यावी.

७. सदर शासन निर्णयातील वरील सूचनांचे सर्व संबंधितांनी तंतोतंत पालन करावे.

८. या शासन निर्णयानुसार वाचा क्र. १ ते ३ मधील शासन निर्णय/ शासन शुध्दीपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे.

९. सदरचा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२१७१५४०१३८३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB1764425750 37160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF 6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.02.17 15:41:14 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सह सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य (सर्व)
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड, प्रादेशिक कार्यालय, पुणे.
९. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई.
१०. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
११. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१२. जिल्हा विशेष लेखा परिक्षक, सह. संस्था (सर्व)
१३. उप/सहा. निबंधक, सहकारी संस्था (सर्व)
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. (सर्व)
१५. निवड नस्ती-१८-स.